मुद्दा क्र. १६

(१६)

**सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत वितरण करण्यात येणाऱ्या जीवनावश्यक वस्तुंवर देखरेख ठेवण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या दक्षता समित्यांच्या बैठका नियमितपणे आयोजीत न करणाऱ्या सदस्य सचिवांविरूध्द शिस्तभंगाची कारवाई करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
शासन परिपत्रक क्रमांक:दक्षस-१००७/प्र.क्र.५४८/नापु.२१
मंत्रालय विस्तार,मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ३ जुलै, २००९

संदर्भ :- १) शासन निर्णय सम क्रमांक दि.२३ जानेवारी, २००८

**-: शासन परिपत्रक :-**

उपरोक्त संदर्भीत शासन निर्णयानुसार सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत वितरण करण्यात येणाऱ्या जीवनावश्यक वस्तुंवर देखरेख ठेवण्यासाठी विविध स्तरावरील दक्षता समित्या गठीत करण्याचे एकत्रित आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. सदर शासन निर्णयातील परिच्छेद ७ मध्ये दक्षता समित्यांच्या बैठका आयोजीत करण्याच्या कार्यपध्दतीबाबत सविस्तर आदेश देण्यात आलेले आहेत. सदर आदेश खालीप्रमाणे आहेत.

**७ (अ)** :- सर्व स्तरावरील प्रत्येक दक्षता समितीची बैठक महिन्यातून एकदा घेण्यात यावी. समितीच्या सदस्य सचिवांनी शक्यतो त्याच बैठकीमध्ये पुढील बैठकीची तारीख समितीच्या अध्यक्षांकडून ठरवून घ्यावी. जर काही कारणास्तव बैठकीची तारीख ठरविणे शक्य झाले नाही तर सदस्य सचिवांनी त्या महिन्याच्या १५ तारखेच्या आत समितीच्या अध्यक्षांशी संपर्क साधून बैठकीची तारीख आणि वेळ निश्चित करावी. त्याच महिन्याच्या २० तारखेपर्यंत काही अपरिहार्य कारणास्तव अध्यक्षांकडून बैठकीची तारीख निश्चित करून मिळाली नाही तर सदस्य सचिवांनी बैठकीची वेळ स्वतः ठरवावी व त्याप्रमाणे समितीच्या सर्व सदस्यांना कळवावे. दक्षता समितीच्या बैठका नियमितपणे घेण्याची संपुर्ण जबाबदारी समितीच्या सदस्य सचिवांची राहील.

**(ब)** दक्षता समित्या स्थायी स्वरूपाच्या समित्या असल्यामुळे दक्षता समितीवरील सर्व किंवा काही अशासकीय सदस्यांची नियुक्ती होणे बाकी असले तरीही दक्षता समितीच्या बैठका नियमितपणे घेण्यात याव्यात.

**(क)** सर्व दक्षता समित्यांच्या बैठका वेळच्या वेळी घेतल्या जातात किंवा नाही याची जिल्हास्तरावर अपर जिल्हाधिकारी यांनी तर मुंबई /ठाणे शिधावाटप क्षेत्रामध्ये नियंत्रक शिधावाटप, मुंबई यांनी स्वतः खातर जमा करावी.

२. दक्षता समित्यांच्या बैठका नियमितपणे घेण्याबाबत उपरोक्त संदर्भित शासन निर्णयामध्ये स्पष्ट आदेश देण्यात आलेले असूनही तसेच बैठका घेण्याबाबत शासनाकडूनही वारंवार सुचना/आदेश देऊनही सर्वच स्तरावरील दक्षता समित्यांच्या बैठका नियमितपणे होत नाहीत अशा तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत.

...

(१६३)

दक्षता समित्यांच्या नियमितपणे बैठका न घेण्यात आल्यामुळे दक्षता समित्या स्थापन करण्याच्या मुळ हेतूलाच बाधा पोहचत असून दक्षता समित्या निष्प्रभ ठरत आहेत. त्यामुळे शासन निर्णय दि.२३/०१/२००८ अन्वये दक्षता समित्यांच्या बैठका घेण्याबाबत स्पष्ट सुचना देऊनही **यापुढे सर्व स्तरावरील दक्षता समित्यांच्या बैठका नियमितपणे आयोजीत न केल्यास सर्व स्तरावरील दक्षता समित्यांच्या सदस्य सचिवांविरूध्द कर्तव्यच्युती बाबत महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ चे उल्लंघन केल्याबाबत शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.** याबाबतची कार्यवाही संबंधित जिल्हाधिकारी यांनी करावी.

४. दक्षता समित्यांच्या बैठका नियमितपणे होतात किंवा नाही याबाबत जिल्हास्तरावर संबंधित अपर जिल्हाधिकारी आणि नियंत्रक शिधावाटप, मुंबई यांनी खातरजमा करावयाची असून त्यांच्याकडूनही त्याप्रमाणे कार्यवाही होत निदर्शनास नसल्याचे आले आहे. त्यामुळे यापुढे दक्षता समित्यांच्या बैठका नियमितपणे आयोजित केल्या जातात किंवा कसे याबाबीवर संबंधित अपर जिल्हाधिकारी आणि नियंत्रक शिधावाटप, मुंबई यांनी स्वत: जातीने लक्ष देऊन त्याबाबतचा अहवाल मला प्रत्येक महिन्याच्या १५ तारखेपर्यंत सादर करण्याबाबत उचित कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(भुपतिप्रसाद पाण्डेय)
प्रधान सचिव
अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

प्रति,
१) सर्व विभागीय आयुक्त
२) सर्व उप आयुक्त (पुरवठा)
३) सर्व जिल्हाधिकारी
४) सर्व अपर जिल्हाधिकारी
५) सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी
६) सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी
७) नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई
८) वित्तीय सल्लागार व उप सचिव,अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
९) उप आयुक्त (पुरवठा) पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, मुंबई
१०) सर्व मंत्रालयीन विभाग
११) महासंचालक माहिती व जनसंपर्क,मुंबई
१२) खाजगी सचिव,मा.मंत्री,अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण
१३) खाजगी सचिव, मा.राज्यमंत्री, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण
१४) सर्व कार्यासने, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
१५) निवड नस्ती.

Stay Note Llwp